# प्रेसनोट

दिनांक ०८/०९/२०२०

**ग्रामपंचायत कार्यालय राहटी ता.जि. नांदेड येथील ग्रामविकास अधिकारी श्री हनमंत वाडेकर व खाजगी इसम बालाजी वाघमारे यांना १,५०,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी रंगेहाथ पकडले.**

दिनांक ०७/०९/२०२० रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, "यातील लोकसेवक हनमंत वाडेकर हे तक्रारदार यांना त्यांचे राहते घराचे बाजुला गावठाणचा प्लॉट असुन सदर प्लॉट त्यांचे ताब्यात ५० वर्षापासुन असुन तक्रारदार यांचे ताब्यातील प्लॉट ग्रामपंचायतचे नमुना न. ८ वर तक्रारदार यांचे नावे चढविण्यासाठी १,५०,०००/– रू. लाचेची मागणी करीत आहेत".

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक ०८/०९/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक वाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे उपरोक्त कारणासाठी १,५०,०००/– रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आज दिनांक ०८/०९/२०२० रोजी विस्तारीत नाथनगर येथे लोकसेवक वाडेकर यांचे राहते घराचे परिसरात लावण्यात आलेल्या सापळ्यामध्ये लोकसेवक वाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडुन खाजगी इसम बालाजी वाघमारे यांचे मार्फतीने १,५०,०००/– रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून आरोपी लोकसेवक (१) हनमंत मणाजी वाडेकर, वय ५० वर्ष, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय राहटी ता.जि. नांदेड रा. विस्तारीत नाथनगर नांदेड (२) बालाजी मरीबा वाघमारे, वय २५ वर्ष व्यवसाय मंजुरी, रा. कर्मविर नगर नांदेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये पोलीस स्टेशन विमानतळ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असुन सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक राजेश पुरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री. विजय डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राजेश पुरी, कपिल शेळके, पोना. एकनाथ गंगातिर्थ, दर्शन यादव, नरेंद्र बोडके, मपोना आशा गायकवाड यांनी पार पाडली आहे

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२–२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

मा.संपादक, दैनिक ..............................

कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner